**प्रेसनोट दिनांक ५/०७/२०१९**

**विमानतळ पोलीस स्टेशन पुणे शहर**

**गंभीर गुन्हयातील पाहीजे आरोपीला विमानतळ पोलीसांनी केली ६ वर्षाने अटक**

विमानतळ पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर १७/२०१२ भा.दं.वि.कलम ३६३,३६३(अ),३७६ या गुन्हयातील पाहीजे आरोपीला ६ वर्षाने विमानतळ पोलीसांनी अटक करुन गुन्हा उघडकिस आणुन उत्कृष्ठ कामगिरी केले बाबत...

दिनांक २५/०१/२०१२ रोजी इसम वय ४५ वर्षे रा. विमाननगर पुणे यांनी त्यांची अल्पवयीन मुलगी वय १५ वर्षे रा. सदर हिस आरोपी नामे बबलु रामप्रीत पासवान वय ३६ वर्षे रा. लेबर कॅम्प वडगांवशेरी पुणे हिस सन २०१० पासुन तिचेवर तिचे ईच्छे विरुध्द अनैतिक शारीरीक संबध ठेवुन ती गरोदर असल्याचे समजल्याने तिला लग्नाचे अमिष दाखवुन त्यांचे कायदेशिर रखवालीतुन पळवुन नेलेले असल्याची आरोपीचे विरुध्द तक्रार दिल्याने विमानतळ पोलीस स्टेशन पुणे येथे तक्रार दिल्याने वरील प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.दाखल गुन्हयातील आरोपीचा विमानतळ पोलीस स्टेशन येथील तपास पथकातील अधिकारी व गुन्हयाचे तपासी अंमलदार सहा.पोलीस निरीक्षक श्री कोलते हे शोध घेत होते, परंतु सदरचा आरोपी कोठेतरी फरार झालेला असल्याने तो मिळुन येत नसल्याने सदर गुन्हयाचे तपासी अंमलदार सहा. पोलीस निरीक्षक श्री कोलते यांनी आरोपीचे विरुध्द सी आर पी सी २९९ प्रमाणे मा. न्यायालयात दोषारोपपत्र सादर केलेले होते.

सदरचा पाहीजे असलेला आरोपी नामे बबलु रामप्रीत पासवान वय ३६ वर्षे रा. लेबर कॅम्प वडगांवशेरी पुणे याचा विमानतळ पोलीस ठाणे येथील तपास पथकाचे अधिकारी व कर्मचारी असे त्यांचे बातमीदारां मार्फत बातमी काढुन शोध घेत होते. दिनांक ०१/०७/२०१९ रोजी सदरचा आरोपी यमुनानगर विमाननगर पुणे येथे येणार असल्याची माहीती तपास पथकाचे पोलीस उप निरीक्षक श्री पिंगळे यांना मिळाल्याने त्यांनी त्यांचे पोलीस हवा. अशोक आटोळे, पो.ना.संजय आढारी, पो शि पुष्पेंद्र चव्हाण, पो ना विशाल गाडे, पोलीस शिपाई महाजन यांनी विमाननगर पुणे येथे सापळा लावुन आरोपी बबलु रामप्रीत पासवान हा तेथे आल्याने त्यास ताब्यात घेतले.त्याचेकडे पोलीस उप निरीक्षक श्री पिंगळे यांनी दाखल गुन्हयाबाबत चौकशी केली असता त्याने गुन्हा केल्याची कबुली देवुन तो गुन्हा दाखल झाले पासुन पुणे येथुन बाहेर निघुन गेल्याचे सांगितल्याने त्यांनी त्यास रात्रौ २१/०० वाजता दाखल गुन्हयात अटक केलेली आहे. नमुद अधिकारी व कर्मचारी यांनी सदरचा गुन्हा उघडकिस आणुन विमाननगर पुणे रात्री २१/०० वाजता येथे आल्याने त्यास पोलीस उप निरीक्षक श्री पिंगळे व वरील स्टाफने ताब्यात घेवुन विमानतळ पोलीस स्टेशन पुणे येथे आणुन त्याचेकडे चौकशी केली असता त्याने गुन्हा दाखल झालेचे त्याला समजल्यावर बाहेर निघुन गेल्याचे सांगितले. पोलीस उप निरीक्षक पिंगळे यांनी त्यास रात्रौ २१/३० वाजता गुन्हयामध्ये अटक केलेली आहे. सदरचा गंभिर गुन्हयातील पाहीजे आरोपीला वरील नमुद अधिकारी व पोलीस कर्मचारी यांनी अटक करुन उत्कृष्ठ कामगिरी केलेली आहे.गुन्हयाचा पुढील तपास सहा पोलीस निरीक्षक श्री जे सी. मुजावर हे करीत आहेत.

(राजेंद्र पाटील)<br>
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,<br>
विमानतळ पोलीस स्टेशन पुणे.